मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# सात माजी महापौर निवडणुकीच्या रिंगणात

## भाजपकडून 5, राष्ट्रवादी काँग्रेसकडून 2; माजी महापौरांच्या पुत्रांचाही निवडणूक रणसंग्राम

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीच्या रिंगणात सात माजी महापौर उतरले आहेत. भाजपकडून पाच आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून दोन माजी महापौर निवडणूक लढवत आहेत. चार माजी महापौरांचे पुत्रही आपले नशीब अजमावत आहेत.




पिंपरी-चिंचवड महापालिकेची स्थापना सन १९८६ साली झाली. महापालिकेचे पहिले महापौर होण्याचा मान ज्ञानेश्वर लांडगे यांना मिळाला. त्यांचे पुत्र ॲड. नितीन लांडगे भाजपकडून निवडणूक लढवित आहेत. माजी महापौर कै. अरविंद उर्फ नाना शितोळे यांचे चिरंजीव अतुल शितोळे, माजी महापौर हनुमंत भोसले यांचे चिरंजीव राहुल भोसले हे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून निवडणूक रिंगणात आहेत. माजी महापौर मंगला कदम यांचे चिरंजीव कुशाग्र कदम हे भाजपकडून निवडणूक लढवित आहेत.

माजी महापौर योगेश बहल हे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून प्रभाग क्रमांक २० संत तुकारामनगर-कासारवाडीमधून निवडणूक रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक ९ नेहरूनगर-खराळवाडीतून वैशाली घोडेकर निवडणुकीच्या रिंगणात आहेत. भाजपकडून प्रभाग क्रमांक १९ चिंचवड-केशवनगरमधून अपर्णा डोके, प्रभाग क्रमांक ३२ सांगवी-शितोळेनगर येथून उषा ढोरे, प्रभाग क्रमांक २९ पिंपळे गुरव-जवळकर नगरमधून शकुंतला धराडे, प्रभाग क्रमांक दोन मोशी-जाधववाडीतून राहुल जाधव, प्रभाग क्रमांक तीन चऱ्होली-डुडुळगावमधून नितीन काळजे हे माजी महापौर निवडणूक रिंगणात आहेत.

योगेश बहल यांच्याविरोधात भाजपचे सतीश नागरगोजे, वैशाली घोडेकर यांच्यासमोर भाजपच्या मीनाज इनामदार, अपर्णा डोके यांची लढत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या पूजा अगज्ञान, शकुंतला धराडे यांची लढत सुनीता कोळप, राहुल जाधव यांची लढाई विशाल आहेर, नितीन काळजे यांची प्रकाश आल्हाट यांच्याशी होत आहे. उषा ढोरे यांना त्यांच्याच पक्षाच्या माजी नगरसेविका शारदा सोनवणे यांनी आव्हान दिले आहे.

### 22 जागांवर माजी नगरसेवक समोरासमोर

» पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत २२ जागांवर ४७ माजी नगरसेवक, माजी महापौर, माजी उपमहापौर, माजी सत्तारूढ पक्षनेते, माजी स्थायी समिती अध्यक्ष, विरोधी पक्षनेते व पदाधिकारी समोरासमोर आले आहेत. त्यामुळे लढतीची रंगत वाढली आहे. निकालानंतर एका माजी नगरसेवकाचा विजय होणार असून पराभूत माजी नगरसेवकांना घरी बसावे लागणार आहे.

### 692 उमेदवार निवडणूक रिंगणात

» महापालिका निवडणुकीसाठी ३० डिसेंबरपर्यंत अर्ज भरण्याची मुदत होती. या मुदतीत ३२ प्रभागांतील १२८ जागांसाठी एक हजार ९९३ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. छाननीमध्ये ९९ जणांचे अर्ज अपात्र ठरले. एक हजार ८९४ उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले होते. त्यापैकी गुरुवारी राजकीय पक्षांसह ३८ अपक्ष उमेदवारांनी माघार घेतली होती. शुक्रवारी शेवटच्या दिवशी ४४३ उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली.

---

# त्रिवेणीनगर परिसरात भाजपच्या उमेदवारांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; प्रभाग 12 मध्ये परिवर्तनाचे वारे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १२ मध्ये भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली असून, त्रिवेणीनगर परिसरात अबालवृद्धांचा उत्स्फूर्त प्रतिसाद त्यांना मिळत आहे. केंद्र आणि राज्यात भाजपची सत्ता असल्याने स्थानिक पातळीवरही विकासाची ही गंगा अखंड वाहती राहील आणि हे पॅनल परिसराचा निश्चितपणे कायापालट करेल, असा ठाम विश्वास सध्या येथील नागरिकांमध्ये दिसून येत आहे. या प्रचार दौऱ्यांमध्ये विशेषतः महिलांची उपस्थिती लक्षणीय असून, मतदारांचा वाढता पाठिंबा पाहता भाजपच्या चारही उमेदवारांसाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे.



या निवडणुकीत भोसरी विधानसभेचे आमदार महेशदादा लांडगे यांनी स्वतः प्रभाग १२ कडे विशेष लक्ष दिले असून, ते भाजपच्या चारही उमेदवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. आमदारांच्या या विशेष लक्षामुळे प्रभागातील विकासकामांना मोठी गती मिळणार असून भविष्यात त्रिवेणीनगर, रुपीनगर आणि तळवडे परिसराचा चेहरामोहरा बदलेल, अशी खात्री मतदारांना वाटत आहे.

महापालिकेवर पुन्हा एकदा भाजपचा झेंडा फडकणार असून प्रभाग १२ मधून भाजपचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास कार्यकर्त्यांनी आणि स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे.

> “ त्रिवेणी नगर मध्ये लाभलेला नागरिकांचा प्रतिसाद अभूतपूर्व होता. नागरिकांनी उत्स्फूर्तपणे आमचे स्वागत केले आणि आमच्यावर विश्वास व्यक्त केला. नागरिकांचा विश्वास हीच आमची खरी ताकद आहे.
>
> - प्रवीण भालेकर, भाजप, उमेदवार.



# मोशी प्रभागात आमदार महेश लांडगे यांची भव्य पदयात्रा

## माजी महापौर राहुल जाधव यांच्या नेतृत्त्वात भाजपाच्या पॅनेलचा प्रचार आघाडीवर!

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हिंदुत्ववादी आमदार महेशदादा लांडगे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार, दि. 6 जानेवारी 2026 रोजी सायंकाळी 4 वाजता भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही पदयात्रा वूड्सविले फेज टू, लक्ष्मी चौक येथून सुरू होऊन स्वराज रेसिडेन्सी ते प्रेस्टिंग ग्रीन सोसायटी फेज 1, 2 व 3 मार्गे स्वदेशा सोसायटी, श्रीरामचौक व रिव्हर परिसरातून मार्गक्रमण करणार आहे.

> प्रभाग क्रमांक २ मधील मोशी, बोऱ्हाडेवाडी, जाधववाडी आणि चिखली परिसराचा सर्वांगीण विकास हेच आमच्या पॅनेलचे प्रमुख ध्येय आहे. पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, महिला व युवक सक्षमीकरण यांसह मूलभूत सुविधांना सर्वोच्च प्राधान्य देत पारदर्शक, लोकाभिमुख आणि गतिमान कारभार करण्याचा आम्ही ठाम निर्धार केला आहे. नागरिकांच्या प्रत्येक समस्या ऐकून वेळेत आणि गुणवत्तापूर्ण उपाययोजना राबवणे, विकासकामांमध्ये कोणताही भेदभाव न ठेवता सर्व घटकांना न्याय देणे आणि प्रभागाला आदर्श बनवणे हेच आमचे वचन आहे. 'चारही मते भाजपला' देऊन आमच्या पॅनेलला संधी दिल्यास, प्रभाग क्रमांक २ मध्ये विकासाचा नवा अध्याय निश्चितच सुरू होईल.
>
> **– राहुल जाधव, माजी महापौर, उमेदवार, भाजपा, प्रभाग- 2 मोशी.**

प्रभाग क्रमांक 2 अंतर्गत येणाऱ्या मोशी, बोऱ्हाडेवाडी, जाधववाडी व चिखली परिसरात ही पदयात्रा काढण्यात येणार असून नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद अपेक्षित आहे. भारतीय जनता पार्टीकडून या प्रभागात सुजाता निलेश बोराटे (अ – ओबीसी महिला), सारिका नितिन बोऱ्हाडे (ब – सर्वसाधारण महिला), राहुल गुलाब जाधव (क – सर्वसाधारण) आणि निखिल शिवाजी बोऱ्हाडे (ड – सर्वसाधारण) हे उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

पदयात्रेदरम्यान प्रभागाच्या विकासाचा आढावा घेत "प्रभाग क्रमांक 2 मध्ये आता फक्त कमळच" तसेच "प्रभाग 2 च्या प्रगतीला चारही मते भाजपला" अशा घोषणा देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली. 'कमळ' या निवडणूक चिन्हासमोरील बटन दाबून भाजपच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन यावेळी करण्यात येणार आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदान गुरुवार, दि. 15 जानेवारी 2026 रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 वाजेपर्यंत होणार आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध पक्षांचे प्रचार कार्यक्रम वेग घेत असून प्रभाग क्रमांक 2 मध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे.




# 'युवा नेतृत्वा'ला जाधववाडी, मोशीत उत्स्फूर्त प्रतिसाद

## विशाल आहेर यांच्या झंझावाताने प्रभाग 2 मध्ये परिवर्तनाचे वारे

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २ मध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, राष्ट्रवादी कॉँग्रेसचे तरुण तडफदार उमेदवार विशाल आहेर यांनी आपल्या जनसंपर्काचा धडाका लावला आहे. एका बाजूला माजी महापौरांचे तगडे आव्हान समोर असताना, विशाल आहेर यांनी आपल्या 'व्हिजनरी' कार्यशैलीने आणि कामाच्या जोरावर या लढतीला मोठी धार निर्माण करून दिली आहे.



विशेष म्हणजे, कोणतेही अधिकृत पद नसतानाही त्यांनी जाधववाडी आणि मोशी परिसरातील नागरिकांच्या मूलभूत समस्या ज्या पद्धतीने मार्गी लावल्या, त्याची चर्चा सध्या संपूर्ण प्रभागात रंगत आहे.

विशाल आहेर यांच्या प्रचाराची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्यांचा "सर्वसामान्य चेहरा" ही आहे. एका साध्या कष्टकरी कुटुंबातून पुढे आलेले नेतृत्व असल्याने जनसामान्यांमध्ये त्यांच्याबद्दल मोठी आपुलकी आणि विश्वास पाहायला मिळत आहे. तरुणांमध्ये असलेली त्यांची क्रेझ आणि ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी असलेली त्यांची तत्परता यामुळे या मतदारसंघात तरुण विरुद्ध अनुभवी असा रंगतदार सामना रंगणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. आहेर यांच्याकडे विकासाचे एक स्पष्ट व्हिजन असून, त्यांची त्वरित निर्णय घेण्याची क्षमता प्रशासकीय पातळीवरही कौतुकास्पद ठरत आहे.

प्रभागातील पदयात्रा आणि कोपरा सभांना नागरिकांचा मिळणारा प्रतिसाद अभूतपूर्व आहे. विशेषतः जाधववाडी आणि मोशी येथील महिला आणि युवकांनी विशाल आहेर यांना आपला पाठिंबा दर्शविला आहे. "आमच्या हाकेला धावून येणारा माणूस" अशी त्यांची ओळख निर्माण झाली असून, केवळ निवडणुका डोळ्यासमोर न ठेवता गेली अनेक वर्षे ते समाजकार्यात सक्रिय आहेत, ही बाब त्यांच्यासाठी अधिक फायद्याची ठरत आहे.

या संपूर्ण निवडणुकीचे आणि प्रचाराचे नियोजन अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने केले जात असून, माजी नगरसेवक वसंत बोराटे हे स्वतः या पॅनलमध्ये असल्याने त्यांच्या अनुभवाचा फायदा प्रचारात होत आहे. बोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आखण्यात आलेले नियोजनबद्ध कार्यक्रम आणि कार्यकर्त्यांचे जाळे यामुळे विशाल आहेर यांची मोर्चेबांधणी अत्यंत मजबूत झाली आहे. विरोधकांकडे सत्तेचा अनुभव असला, तरी आहेर यांच्याकडे असलेल्या जनशक्तीच्या जोरावर प्रभाग २ मध्ये यावेळी मोठे परिवर्तन होणार, असा ठाम विश्वास राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

# विमानातील ही सुविधा बंद! डीजीसीएचे निर्देश...

**महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरही आवश्यक माहिती वेळेत उपलब्ध करून दिली जात नसल्याने प्रशासन निष्क्रिय असल्याचा ठपका ठेवला जात आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

मोबाईल किंवा इतर इलेक्ट्रिक उपकरण चार्ज करण्यासाठी लिथियम बॅटरीचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. परंतु यामुळे आगीच्या घटना घडत असून विमान प्रवासातील सुरक्षेला प्राधान्य देत नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) विमानात उड्डाणादरम्यान पॉवर बँक किंवा पोर्टेबल चार्जरचा वापर करून मोबाइल फोन किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे चार्ज करण्यास पूर्णपणे बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर आता विमानातील आसनाच्याच्या ' पॉवर आउटलेट' द्वारेही मोबाईल, इलेक्ट्रिक उपकरणे चार्ज करण्यास बंदी घातली आहे.

हवाई उड्डाणांमध्ये या नियमाची तत्काळ कार्यवाही करण्यास सुरुवात झाली असून विमान कंपन्यांनी सुरक्षित प्रवास करण्यासाठी प्राधान्य देत प्रवासापूर्वी घोषणा करण्यास सुरुवात केली आहे.

डीजीसीएने सुरक्षित अन् सुलभ हवाई प्रवास अंतर्गत स्वयं परिपत्रक काढले आहे. त्यामध्ये म्हटल्याप्रमाणे विविध रिचार्जेबल उपकरणांमध्ये लिथियम बॅटरीचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. विमानातही लिथियम बॅटरी वाहून नेण्याचे प्रमाण वाढले आहे. पॉवर बँक, पोर्टेबल चार्जर आणि लिथियम बॅटरी असलेली तत्सम उपकरणे आग लावू शकतात आणि विमानात आग लागण्याचा धोका निर्माण करू शकतात. ओव्हरहेड स्टोरेज कंपार्टमेंटमध्ये किंवा कॅरी-ऑन बॅगेजमध्ये साठवलेल्या लिथियम बॅटरी लपलेल्या असतात, यांचा प्रवासात वापर झाल्यास आग लागणे, सुरक्षिततेला धोका पोहोचवणे असे अनुचित प्रकार घडत आहे. बहुतांशदा प्रवाशांना किंवा क्रू सदस्यांना सहजपणे व गोष्टी निदर्शनास येत नाही. सहजच या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष केले जाऊ शकते. यामुळे धूर किंवा आगीचा शोध घेण्यास आणि प्रतिसाद देण्यास विलंब होऊ शकतो, ज्यामुळे उड्डाण सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो, त्या पार्श्वभूमीवर डीजीसीएने आदेश काढले आहे.

हवाई उड्डाणांमध्ये या नियमाची तत्काळ कार्यवाही करण्यास सुरुवात झाली असून विमान कंपन्यांनी सुरक्षित प्रवास करण्यासाठी प्राधान्य देत प्रवासापूर्वी घोषणा करण्यास सुरुवात केली आहे. हा निर्णय विमान प्रवास आणखी सुरक्षित करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. प्रवाशांनी या नव्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, जेणेकरून कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, असेही पत्रकात म्हटले आहे.



### प्रशिक्षण आणि सूचना

» विमान कंपन्यांनी क्रू मेंबर्सना विशेष प्रशिक्षण देणे, सुरक्षा मूल्यांकन सुधारणे आणि आग प्रतिबंधक उपाय योजनांचा अवलंब करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रवाशांनीही पूर्ण चार्ज केलेले उपकरणे घेऊन प्रवास करावा आणि पॉवर बँक सुरक्षितपणे हँड बॅगेजमध्ये ठेवावा, असे आवाहन डीजीसीएने केले आहे.

### सतर्कतेचे आदेश

» सध्याच्या विमान सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांनुसार, पॉवर बँक आणि स्पेअर लिथियम बॅटरी फक्त केबिन बॅगेज (हँड लगेज)मध्ये घेऊन जाण्याची परवानगी आहे. चेक-इन बॅगेजमध्ये किंवा ओव्हरहेड बिनमध्ये ठेवता येणार नाही. उड्डाणादरम्यान पॉवर बँकचा वापर पूर्णपणे प्रतिबंधित आहे. जर एखाद्या उपकरणातून धूर, उष्णता किंवा असामान्य वास येत असेल, तर प्रवाशांनी तात्काळ केबिन क्रूला कळवावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

### या पूर्वीची पार्श्वभूमी

» जागतिक स्तरावर लिथियम बॅटरीमुळे आग लागण्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. भारतातही ऑक्टोबरमध्ये इंडिगोच्या एका विमानात पॉवर बँकला आग लागल्याची घटना घडली होती. याच पार्श्वभूमीवर डीजीसीएने हा कठोर निर्णय घेतला आहे. विमान कंपन्यांना प्रवाशांना बोर्डिंग घोषणा आणि उड्डाणातील सूचनांद्वारे या निर्बंधांची आठवण करून देण्यास सांगितले आहे. तसेच, लिथियम बॅटरीशी संबंधित कोणतीही घटना तात्काळ डीजीसीएला कळवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोच्या 'त्या' चाचणीचा अडथळा दूर; लवकरच धावणार

**एकूण 22 पैकी 14 मेट्रो ट्रेन पुण्यात दाखल; पीएमआरडीएच्या मेट्रो लाईन 3 च्या कामाला गती, मार्चपर्यंत पहिल्या टप्प्याचे नियोजन.**

**पुणे | प्रतिनिधी**

माण-हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो प्रकल्पाचे काम गतीने सुरू आहे. मेट्रो रेल्वेच्या सुरक्षितता व तांत्रिक मानकांची पडताळणी करणाऱ्या रिसर्च डिझाइन्स अँड स्टँडर्ड्स ऑर्गनायझेशनची (आरडीएसओ)ची अनिवार्य तपासणी नुकतीच यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे. मेट्रो सुरू करण्यापूर्वीची ही तपासणी महत्त्वाची मानली जाते.माण-हिंजवडी ते शिवाजीनगर यांना जोडणारा एक महत्त्वाचा उपक्रम असलेल्या पुणे मेट्रो लाईन ३ प्रकल्पाचे काम अंतिम टप्यात आहे

यापूर्वी या मेट्रोची चार स्टेशनपर्यंत चार ते पाच वेळा चाचणी घेण्यात आली. नुकत्याच झालेल्या आरडीओच्या तपासणीमुळे ही मेट्रो कार्यान्वित होण्याच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचली आहे. प्रत्येक शहराची मेट्रो वेगवेगळ्या कंपन्यांनी बनवलेली असू शकते. हे नवीन तंत्रज्ञान भारतीय वातावरणात आणि ट्रॅकवर योग्यरित्या काम करेल, याची खात्री करण्याचे काम आरडीएसओ करते.

भारतात धावणाऱ्या प्रत्येक मेट्रोची संरचना, डब्यांची रुंदी, ट्रॅकचे मोजमाप आणि वीज पुरवठा यंत्रणा ही सुरक्षित आहे की नाही, हे तपासण्यासाठी आरडीएसओकडे ठराविक मानके असतात. मेट्रो या मानकांवर उतरते की नाही, हे पाहणे आवश्यक असते. मेट्रोमध्ये दररोज हजारो नागरिक प्रवास करतात. वळणे, आपत्कालीन ब्रेक यंत्रणा आणि डब्यांची स्थिरता यांची कठोर चाचणी आरडीएसओद्वारे केली जाते. त्यांच्या प्रमाणपत्राशिवाय मेट्रो प्रवाशांसाठी सुरू करता येत नाही.

मेट्रो जेव्हा रुळांवरून वेगाने धावते, तेव्हा तिची हालचाल मर्यादेत आहे की नाही हे तपासले जाते. आरडीएसओचे तज्ज्ञ अत्याधुनिक उपकरणांद्वारे या चाचण्या करतात. त्यामुळे ही तपासणी महत्त्वाची आहे. पीएमआरडीएने दिलेल्या माहितीनुसार, प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या मेट्रो गाड्यांच्या पुरवठ्यातही समाधानकारक प्रगती झाली आहे.




### २२ गाड्या लवकरच उपलब्ध होणार

» आतापर्यंत १४ मेट्रो ट्रेनसेट्स प्राप्त झाले असून, मंजूर वेळापत्रकानुसार एकूण २२ गाड्या लवकरच उपलब्ध होणार आहेत. या गाड्यांच्या आधारे टप्प्याटप्प्याने चाचण्या, ट्रायल रन आणि पुढे नियमित प्रवासी सेवा सुरू करण्याची तयारी केली जाणार आहे. साधारणपणे मार्च 2026 पर्यंत या मेट्रोचे काही स्टेशनचे काम पूर्ण करून सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# विकास हाच आमचा अजेंडा; रामभाऊ दाभाडे यांचा वाघोलीतून प्रचार प्रारंभ

## लोहगाव, विमाननगर आणि वाघोली प्रभाग 3 मध्ये भाजपच्या प्रचाराचा धडाका; रामदास दाभाडे, अनिल सातव, ऐश्वर्या पठारे आणि श्रेयस खांदवे रिंगणात.

**पुणे | प्रतिनिधी**

आम्ही कोणावरही विनाकारण टीका करीत नाही. मात्र जाणीवपूर्वक, हेतूपुरस्सर टीका करणाऱ्यांना सोडणार नाही, असा ठाम इशारा माजी जिल्हा परिषद सदस्य रामभाऊ दाभाडे यांनी दिला. पुणे महानगरपालिकेच्या लोहगाव, विमाननगर, सोमनाथनगर व वाघोली प्रभाग क्रमांक 3 मधील भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचार शुभारंभप्रसंगी ते बोलत होते.

या प्रचाराची सुरुवात लोहगाव येथील जगद्गुरु संत तुकाराम महाराज मंदिरात दर्शन घेऊन करण्यात आली. त्यानंतर वाघोली येथील ग्रामदैवत वाघेश्वर महाराजांचेही दर्शन उमेदवारांनी घेतले. संत तुकाराम महाराज व वाघेश्वर महाराजांच्या चरणी नतमस्तक होत उपस्थित उमेदवारांनी हजारो नागरिक व कार्यकर्त्यांच्या आशीर्वादाने सर्वसामान्य जनतेचा विश्वास संपादन करून प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी बळ मिळावे, अशी प्रार्थना केली.

पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 3 मधील भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार रामदास दत्तात्रेय दाभाडे, अनिल दिलीप सातव, ऐश्वर्या सुरेंद्र पठारे व श्रेयस प्रीतम खांदवे यांनी संत तुकाराम महाराजांचे दर्शन घेऊन नारळ फोडत प्रचाराचा अधिकृत शुभारंभ केला. संत तुकाराम महाराजांच्या विचारांची प्रेरणा घेऊन जनसेवा, पारदर्शक कारभार आणि प्रभागाचा सर्वांगीण विकास एकजुटीने करण्याचा निर्धार उमेदवारांनी यावेळी व्यक्त केला

नागरिकांचा विश्वास हाच भाजपचा खरा विजयाचा आधार आहे, असे सांगत उमेदवारांनी मतदारांचे आशीर्वाद घेतले. या वेळी भारतीय जनता पार्टीच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. लोहगाव परिसरात भाजपच्या प्रचाराला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळताना दिसून आला. पुणे महानगरपालिकेत समावेश होण्यापूर्वी व नंतर वाघोलीतील विविध विकासकामांसाठी रामभाऊ दाभाडे व अनिल सातव यांनी सातत्याने पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून दिला होता.

त्याच धर्तीवर लोहगाव, सोमनाथनगर व विमाननगर परिसरातही ऐश्वर्या पठारे, सुरेंद्र पठारे, प्रीतम खांदवे, श्रेयस खांदवे, रामभाऊ दाभाडे व अनिल सातव यांच्या माध्यमातून स्वखर्चाने तसेच प्रशासनाकडे पाठपुरावा करून अनेक विकासकामे मार्गी लागल्याची चर्चा मतदारसंघात सुरू आहे.



### भाजपच्या प्रचाराला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद

» नागरिकांचा विश्वास हाच भाजपचा खरा विजयाचा आधार आहे, असे सांगत उमेदवारांनी मतदारांचे आशीर्वाद घेतले. या वेळी भारतीय जनता पार्टीच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. लोहगाव परिसरात भाजपच्या प्रचाराला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळताना दिसून आला.पुणे महानगरपालिकेत समावेश होण्यापूर्वी व नंतर वाघोलीतील विविध विकासकामांसाठी रामभाऊ दाभाडे व अनिल सातव यांनी सातत्याने पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून दिला होता.

### अनेक विकासकामे मार्गी लागल्याची चर्चा

» त्याच धर्तीवर लोहगाव, सोमनाथनगर व विमाननगर परिसरातही ऐश्वर्या पठारे, सुरेंद्र पठारे, प्रीतम खांदवे, श्रेयस खांदवे, रामभाऊ दाभाडे व अनिल सातव यांच्या माध्यमातून स्वखर्चाने तसेच प्रशासनाकडे पाठपुरावा करून अनेक विकासकामे मार्गी लागल्याची चर्चा मतदारसंघात सुरू आहे. या प्रभागात भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह काँग्रेस व शिवसेनेचे उमेदवारही निवडणूक रिंगणात उतरले असून, आगामी काळात ही निवडणूक अधिकच रंगतदार होणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

> "आम्ही यापूर्वीही विकासकामे करून दाखवली आहेत आणि यापुढील काळात लोहगाव, विमाननगर, सोमनाथनगर व वाघोली परिसराचा विकास अधिक वेगाने करण्यात येईल. नागरिकांनी केलेल्या अपेक्षा पूर्ण करणे हेच आमचे ध्येय आहे. टीका करण्याऐवजी संवाद साधावा, असे माझे आवाहन आहे. मात्र विनाकारण टीका करणाऱ्यांना योग्य उत्तर दिले जाईल."
>
> \- रामभाऊ दाभाडे, भाजप उमेदवार प्रभाग क्र. 3

# मढेघाट हादरलं! विद्यार्थ्यांवर मधमाशांचा भीषण हल्ला; 56 जण जखमी, 6 जणांची प्रकृती चिंताजनक

## ग्रामस्थ आणि वनविभागाची धावपळ; 6 गंभीर जखमींवर पुण्यातील भारती हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू, इतरांची प्रकृती स्थिर.

**पुणे | प्रतिनिधी**

ऐतिहासिक मढेघाट परिसरात पर्यटनासाठी आलेल्या शालेय विद्यार्थ्यांच्या ग्रुपवर मधमाशांनी अचानक भीषण हल्ला केला. हल्ल्यात एकूण ५६ जण जखमी झाले असून त्यापैकी सहाजणांची प्रकृती चिंताजनक असून त्यांना तातडीने पुण्यात खासगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले आहे. प्राथमिक उपचारानंतर इतर जखमींची प्रकृती स्थिर आहे, असे डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान, दीड वर्षांपूर्वी जुन्नर तालुक्यातील शिवनेरी किल्ल्याजवळ मधमाशाच्या हल्ल्यात पर्यटक जखमी झाले होते.

त्यानंतर ही जिल्ह्यातील दुसरी घटना आहे.ही घटना रविवार (दि.४) रोजी सकाळी घडली. मढेघाट परिसरात १० ते १३ वयोगटातील ५६ विद्यार्थी, १० प्रशिक्षकांचा गट निसर्ग पर्यटनासाठी आला होता. दुपारी मधमाशांच्या मोहोळ उठल्याने त्यांनी ग्रुपवर हल्ला चढवला. त्यावेळी ग्रुपमध्ये विद्यार्थी, प्रशिक्षक हल्ल्याचा बचाव करण्यासाठी सैरावैरा पळत सुटले. मात्र, मधमाशाचा मोहोळ मोठा असल्याने यातील कोणाही सुटले नाहीत.

वन विभाग, केळद येथील ग्रामस्थांनी प्रसंगावधान राखत मदतीसाठी धाव घेतली. जखमींना सुरक्षितस्थळी हलवून रुग्णवाहिकेपर्यंत पोहोचवले. जखमींना पासली येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल केले. मात्र, तिथे डॉक्टर उपलब्ध नसल्याने वेल्हा येथील ग्रामीण रुग्णालयात ३५ जणांवर प्राथमिक उपचार केले.

यात १७ मुले, १४ मुली आणि ४ ज्येष्ठांचा समावेश आहे. ६ जणांना तातडीने पुण्यातील भारती हॉस्पिटलमध्ये दाखल केले. २ मुले, १ मुलगी, २ पुरुष, १ महिला अशा सहाजणांची प्रकृती चिंताजनक आहे. बचावकार्यात धायरी, खेड शिवापूर, वेल्हा येथील '१०८' रुग्णवाहिकांनी कामगिरी बजावली. ऐतिहासिक मढेघाट परिसरात पर्यटनासाठी आलेल्या शालेय विद्यार्थ्यांच्या ग्रुपवर मधमाशांनी अचानक भीषण हल्ला केला. हल्ल्यात एकूण ५६ जण जखमी झाले असून त्यापैकी सहाजणांची प्रकृती चिंताजनक असून त्यांना तातडीने पुण्यात खासगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले आहे.




### महावितरणचे कर्मचारी सक्रिय

» मावळ भागातील '१८ गाव मावळ आपले महावितरण' या व्हॉट्सअॅप ग्रुपने मदतीसाठी मोठी भूमिका बजावली. कर्मचारी सूर्यकांत नारायण शिंदे यांनी ग्रुपवर मदतीचे आवाहन केले. आवाहनाला प्रतिसाद देत अनेक ग्रामस्थ गाड्या घेऊन घटनास्थळी पोहोचले. जखमींना वेल्हा रुग्णालयात दाखल करण्यासाठी मदत केल्याने वेळेत जखमींवर उपचार केले.